ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिका सभा सूचना क्रमांक ०२ दिनांक ८/६/२०१० अन्वये, शुक्रवार दिनांक १८/६/२०१० रोजींच्या मा.सर्वसाधारण सभेसाठी सन्मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची यादी खालीलप्रमाणे .

प्रश्न क्रमांक १ :

सन्मा. सदस्य श्री.जनार्दन कृष्णा खेतले यांनी दिनांक ३०.३.२०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे.

१) वागळे इस्टेट येथील रहेजा कॉम्प्लेक्स येथे असलेल्या पाण्याच्या टाकीखाली व शेजारी असलेली मोकळी जागा कोणत्या ठेकेदारास, किती चौरस फुट, किती तारखेला, किती कालावधीसाठी दरमहा किती पैशाला भाडयाने देण्यांत आली आहे. पैकी आजपर्यंत रक्कम सदर ठेकेदारांनी महापालिकेकडे जमा केली आहे.

२) संपूर्ण ठाणे शहरामध्ये किती ठिकाणी अनधिकृत बांधकामे चालू आहेत. गेल्या तीन वर्षात अनधिकृत बांधकामे पूर्ण झाली आहेत त्यापैकी किती कामांना नोटीसा देण्यांत आल्या आहेत. नोटीसा देऊन सुध्दा किती कामे पूर्ण झालेली आहेत ? सर्व माहिती प्रत्येक प्रभाग समितीवाईज मिळावी.

३) गेल्या तीन वर्षात किती बांधकामे तोडण्यांत आली ? त्यासाइी किती खर्च करण्यांत आला. ( त्यासाठी लागणारी जे.सी.बी., पोकलेन, डंपर व इतर साहित्य) तसेच मनुष्यबळ, कामगार, अधिकारी, पोलिस कर्मचारी यांच्यासह खर्चाची माहिती मिळावी. तसेच या कारवाईद्वारे किती दंड वसूल करण्यांत आला ? सदरची संपूर्ण माहिती प्रत्येक प्रभाग समितीवाईज मिळावी.

४) ठाणे परिवहन क्षेत्रात किती ठिकाणी ठेकेदारांमार्फत थांबे बांधण्यांची निविदा काढण्यांत आली होती ? त्याची मुदत काय ? त्यापैकी किती बस थांबे बांधून पूर्ण झाले आहेत व किती अजून अपूर्ण आहेत ? सदर ठेकेदारांनी किती पैशाचा भरणा परिवहनकडे केला आहे व किती करणे बाकी आहेत ?

प्रश्न क्रमांक २ :

सन्मा.सदस्य श्री.प्रकाश हरिश्चंद्र राऊत हयांनी दिनांक १३.४.२०१० अन्वये लेखी विचारलेल्या प्रश्नांची यादी.

१) सदर नविन भुयारी गटार योजनेच्या कामास कोणता मुहूर्त काढण्यांत आला आहे ?

२) ठाणे पूर्व विभागासाठी स्वतंत्र पंपींग स्टेशन उभारण्यांत येणार आहे का ?

३) सदर नविन भुयारी गटार योजनेचे काम केव्हा पूर्ण होणार आहे त्याचातपशिल मिळेल काय ?

४) ठाणे पूर्व व पश्चिम असे दोन स्वतंत्र पंपिंग स्टेशन उभारण्यांत येणार आहेत काय ?

५) ठाणे पश्चिमेसाठी भुयारी गटार योजनेचे काम जोरात ठाणे पूर्व विभागात सुरु असून, सदर काम ठाणे पूर्व विभागासाठी का प्रलंबित ठेवण्यांत आले आहे ? त्यास कोण जबाबदार आहे ?

**प्रश्न क्रमांक ३ :**

सन्मा.सदस्य श्री.सुरेश चंदू कांबळे हयांनी दिनांक ३.४.२०१० अन्वये लेखी विचारलेल्या प्रश्नांची यादी खालीलप्रमाणे.

१) ठाणे महानगरपालिकेच्या सहा.आयुक्त, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्या सेवा जेष्ठतेची पदोन्नती कोणत्या साली मंजूर करण्यांत आली ?

२) ठाणे महानगरपालिका प्रशासनाने सहा.आयुक्त, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता, सेवा जेष्ठतेची कायम स्वरुपी पदोन्नती करण्यांत आलेली आहे का ? आलेली असल्यास कोणकोणत्या सर्व अभियंत्यांची नियमबाहय पध्दतीने कोणकोणत्या खात्यात, कायम स्वरुपी पदोन्नती करण्यांत आली आहे. संबंधित अभियंत्यांची नांवे लेखी स्वरुपामध्ये देण्यांत यावी.

३) ठाणे महानगरपालिका प्रशासनामध्ये प्रभारी पदोन्नतीचा अधिकार कोणत्या अधिकारामध्ये देण्यांत येतो?

४) तसेच प्रभारी पदभाराच्या कालावधीचा अवधी जास्तीत जास्त किती असतो. तसेच कमीत कमी किती असतो.

५) ठाणे महानगरपालिका प्रशासनाने सदरच्या पदोन्नतीचे अधिकार संबंधित अधिका-यांना देण्यांचे अधिकार आहेत का ? असल्यास त्याचा महाराष्ट्र शासनाचा किंवा ठाणे महानगरपालिका प्रशासनाचा GR देण्यांत यावा व सदरचे आदेश मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कोणत्या कलमांअंतर्गत घेण्यांत आला आहे याबाबतची लेखी स्वरुपामध्ये माहिती देण्यांत यावी.

**प्रश्न क्रमांक ४ :**

सन्मा.सदस्य श्री. सुधीर प्रल्हाद बर्गे हयांनी दिनांक २०.५.२०१० अन्वये लेखी स्वरुपात विचारलेल्या प्रश्नांची यादी.

१) लोढा पॅराडाईज ते भारत फर्टिलायझर्स हया ठिकाणी प्रस्तावित असलेल्या डि पी रस्त्यामध्ये श्री गजानन अपार्टमेंट नावाची अनधिकृत इमारत बाधीत होत आहे का? त्या जमिन मालकाचे नांव काय? विकासकाचे नांव काय? ही इमारत ज्यावेळी बांधण्यांत आली त्यावेळी तत्त्कालिन सहाय्यक उपायुक्त व प्रभाग अधिकारी यांची नांवे काय? जर ही इमारत बाधीत होत असेल तर त्यातील नागरिकांच्या पुनर्वसनाची जबाबदारी कोणाची आहे ? सदर इमारतीला कर आकारणी करण्यांत आलेली आहे का? मलनि:सारण विभागाकडून मलवाहिनी जोडण्याकरिता परवानगी देण्यांत आलेली आहे का ? तसेच पाणी पुरवठा विभागातून नळ संयोजन मंजूर करण्यांत आलेले आहे का ? हया इमारतीच्या बांधकामास जबाबदार कोण ?

२) विकास प्रस्ताव क्र.SO-५/००१२/०८ च्या सुरु असलेल्या इमारतीला विकासकाने त्या जागेवरती सदर इमारतीकरिता रस्त्याचे नियोजन केले आहे का ? त्याचे मोजमाप काय ? सदर इमारतीला महापालिकेच्या शहर विकास विभागाने दिलेल्या मंजूर नकाशा व्यतिरिक्त त्या इमारतीवर बांधकाम झाल्यास

जबाबदार कोण ? त्यावर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यांत येईल ? सदर इमारतीचा नकाशा नियमाचे उल्लंघन करुन मंजूर करण्यांत आला आहे का ? हया इमारतीला मलनि:सारणाकरिता कोणत्या प्रकारची सुविधा आहे ? सदर इमारतीच्या ठिकाणी अग्निशमन दलाची गाडी, ॲम्ब्युलन्स, मलनि:सारण विभागाची गाडी जाण्याकरिता रस्त्याची सुविधा आहे का ?

३) दावा क्र.४५०/२००९ च्या इमारतीच्या विकासकाचे नांव काय ? सदर विकासकाने इमारत बांधतेवेळी न्यायालयाची दिशाभूल करुन, खोटे कागदपत्र सादर करुन स्थगिती आदेश घेऊन इमारतीचे बांधकाम केले आहे का ? ही इमारत ज्या जागेवर बांधण्यांत आलेली आहे त्या जागेवर इमारत बांधण्याच्या अगोदर कोणत्या स्वरुपाचे बांधकाम होते ? त्या ठिकाणी सार्वजनिक वहिवाट बंद करण्यांत आली आहे का ? हया इमारतीला पाणीपुरवठा विभागातर्फे नळ संयोजन मंजूर करण्यांत आले आहे का ? मलनि:सारण विभागातर्फे मलवाहिनी जोडण्याकरिता परवानगी देण्यांत आली आहे का ? उद्वाहन बसविण्याकरिता परवानगी देण्यांत आली आहे का ? हया इमारतीला कर विभागातर्फे कर आकारणी करण्यांत आलेली आहे का ? सध्या हया इमारतीला पाण्याचा वापर कोठून केला जातो ?

४) ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये सुरु असलेल्या अनधिकृत बांधकाम सुरु असलेल्या इमारतीमध्ये घर खरेदी करु नये अशा प्रकारचे कोणकोणत्या वृत्तपत्रांद्वारे आवाहन करण्यांत आले होते ? त्या इमारतींची नांवे काय ? त्यावेळी त्या इमारतीचे बांधकाम कोणत्या स्वरुपाचे होते ? सद्य:स्थितीत त्या इमारतींची बांधकामाची परिस्थिती काय? सदर आवाहनामध्ये कोणकोणत्या प्रकारचे नागरिकांना आवाहन करण्यांत आले होते ? त्या आवाहनांची अंमलबजावणी झाली आहे का ?

५) ठाणे महानगरपालिकेच्या मालकीची स्थावर मालमत्ता विभागात कोणकोणत्या स्वरुपात मालमत्ता आहेत ? त्यांची नांवे देण्यात यावीत ? आजपर्यंत ज्या मालमत्ता भाडे तत्वावर देण्यांत आलेल्या आहेत त्यांची बाजारभावाप्रमाणे भाडयाची रक्कम किती होते ? तसेच भाडयाने देण्यांत आलेल्या मालमत्तांच्या भाडयाची रक्कम बाकी आहे का ? असल्यास त्या मालमत्तांची नांवे काय व त्यांची रक्कम किती ?

<u>प्रश्न क्रमांक ५ :</u>

सन्मा.सदस्या सौ.महेश्वरी संजय तरे हयांनी दिनांक १.६.२०१० अन्वये लेखी स्वरुपात विचारलेल्या प्रश्नांची यादी.

१. येऊर मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार किती बांधकामांवर कारवाई करण्यांत आली ? त्यांची नांवे सविस्तर माहिती देण्यांत यावी.

२. येऊर येथील श्री.परशुराम कापरकर यांच्या अनधिकृत बंगल्यावर कारवाई करण्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतांना सुध्दा अद्यापपर्यंत कारवाई का केली नाही? त्याचे कारण काय ?

३. यास जबाबदार असलेल्या अधिका-यांवर कोणती कारवाई करणार ?

४. तसेच सदर बंगल्यावर कारवाई करणार असल्यास ती केव्हा करण्यांत येईल ?

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : ८/६/२०१०

( सौ.छाया मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

<u>ठाणे महानगरपालिका , ठाणे.</u>

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : ८.६.२०१०

ठाणे महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेची सूचना
सभा सूचना क्रमांक ०२ दिनांक ८.६.२०१०

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती------------------------------
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १८.६.२०१० रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक ०२ दिनांक ८.६.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे ही विनंती.

<u>मा.महापौर महोदय, यांचे मंजूरीने .. .. ..</u>

( सौ.छाया प्र. मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

<u>सभा सूचना क्रमांक ०२, दिनांक ८.६.२०१० ची विषयपत्रिका</u>

<u>प्रश्नोत्तरे</u>

| प्रकरण क्रमांक | विषय |
| --- | --- |
| ४० | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३० अन्वये खालील पाच विशेष समित्यांवर प्रत्येकी ९ सदस्यांची संख्याबळानुसार नेमणूक करणे बाबत.<br>१ ) महिला व बालकल्याण समिती<br>२ ) क्रिडा समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती<br>३ ) माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती<br>४ ) आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती<br>५ ) गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |

| | |
|---|---|
| ४१ | ठाणे महानगरपालिकेच्या दिनांक १७.३.२०१० दिनांक १८.३.२०१० व दि.१८.३.२०१०( सभा सूचना क्र.१०) रोजीच्या मा.सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे बाबत. |
| ४२ | प्रदुषण नियंत्रण कक्ष व केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे समन्वयाने राबविण्यांत येणा-या नाकाम प्रकल्पांसाठी कार्यरत असणारे कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक श्री. ओमसत्यशिव जयवंत परळकर यांना ज्युनिअर केमिस्ट हया रिक्त पदावर नियमित वेतनश्रेणीत सामावून घेणेबाबत. |
| ४३ | महानगरपालिका -नगरपरिषदेमधील अग्निशमन विभागात फायरमन पदावर नियुक्ती करतांना एकूण पदांच्या पाच टक्के पदे होमगार्डमध्ये कमीत कमी ३ वर्षे सेवा झालेल्या उमेदवारांकरिता राखीव ठेवणे बाबत. |
| ४४ | अग्निशमन विभागाकडील अधिकारी व कर्मचा-यांचा रक्कम रुपये १५ लाख एवढया रकमेचा विमा काढणे बाबत मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे बाबत. |
| ४५ | ठाणे महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकरिता एक नग कॉपी प्रिंटर मशिन व दोन नग हायस्पिड झेरॉक्स मशिन खरेदी जुन्या बंद मशिन्स बायबॅकने देऊन करणे बाबत मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर. |
| ४६ | ठाणे महानगरपालिकेमार्फत उन्नती गार्डन येथे २.०० दशलक्ष लिटर्स क्षमतेचा आरसीसी जलकुंभ ठेकेदाराचे स्वत:चे डिझाईन व स्पेसिफिकेशननुसार बांधणे व चाचणीस देणे व कार्यान्वित करणेच्या कामी मा. सर्वसाधारण सभेची वाढीव प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत. |
| ४७ | मौजे शिळ (मुंब्रा) येथील राखीव वन सर्व्हे क्र.२१८/अ या वनविभागाचे जागेत वृक्ष लागवड करणे व त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करणे बाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे बाबत. |
| ४८ | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात एमएमआरडीए मार्फत राबविण्यांत येणा-या रेन्टल हौसिंग स्किम करीताचे नियम ठाणे शहराच्या मंजूर नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे बाबत. |
| ४९ | अतिक्रमण विभागाने जप्त केलेल्या परंतू दंड भरुन न सोडविलेल्या जुन्या/भंगार सामानाची विल्हेवाट लावणेकरिता दर निश्चित करणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे बाबत. |
| ५० | ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाकरिता ५ नग नविन डंपर प्लेसर खरेदी करुन त्यावर बॉडी बांधणे करणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत. |
| ५१ | प्रभाग क्रमांक ५१ मध्ये मनोगत बिल्डींग परिसरातील जुने शौचालय तोडून त्या ठिकाणी वृध्दांना बसण्यासाठी आसन व्यवस्था करणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत. |

५२ मानपाडा-माजीवडा प्रभाग समिती अंतर्गत ठाणे महानगरपालिका शाळा क्र.५३,५४,२५ पातलीपाडा या शाळेच्या शौचालयांचे नुतनीकरण करणे बाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

५३ मानपाडा-माजीवडा प्रभाग समिती अंतर्गत ठाणे महानगरपालिका शाळा क्र.६६ वाघबीळ या शाळेच्या शौचालयांचे नुतनीकरण करणे बाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

५४ मानपाडा-माजीवडा प्रभाग समिती अंतर्गत ठाणे महानगरपालिका शाळा क्र. ४३, १०६ या शाळेच्या शौचालयांचे नुतनीकरण करणे बाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

५५ प्रभाग क्र.१९ मधील पोखरण रस्ता क्र.२ च्या मैत्री टयुलीप ते ओसवाल पार्क पर्यंत पदपथाखालचे गटार नुतनीकरण करणेबाबत खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

५६ वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.०९ अंतर्गत हिरानंदानी गृहसंकुल ते हाईडपार्क ते तुलशीधाम रस्ता जंक्शन पर्यंतच्या हाईडपार्क रस्त्याचे मजबुतीकरण व पुर्नपृष्ठीकरण करणेबाबत खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

५७ प्रभाग क्रमांक ०४ मधील ब्रम्हांड ते हिरानंदानी या रस्त्याला कै.सखाराम दादाभाई पाटील असे नामकरण करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे बाबत.

५८ प्रभाग क्र.२३ मधील अशोकनगर, दादलानी पार्क, बाळकूम येथे ॲमिनिटीज प्लॉटवर उभारण्यांत आलेल्या गार्डनला ठाणे गुणीजन कै. धर्मा बारक्या पाटील असे नामकरण करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे बाबत.

५९ ठाणे महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागाच्या नियमावलीस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे बाबत ( दि.२०.४.२०१० रोजींच्या सभेतील तहकूब प्रकरण).

६० ठाणे महानगरपालिका स्वच्छता आणि आरोग्य उपविधी २०१० बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर.( दि.२०.४.२०१० रोजीच्या सभेतील तहकूब प्रकरण.)

( सौ.छाया प्र. मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- ८.६.२०१०

ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : ८.६.२०१०

ठाणे महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेची सूचना

सभा सूचना क्रमांक ०२ दिनांक ८.६.२०१०
( पुरवणी यादी)

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ७० | प्रभाग क्रमांक ८८ पारशीवाडी, बोभाटे चाळ येथे १६ सीटच्या शौचालयाची पुनर्बांधणी करणे. |
| ७१ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे मार्फत बांधण्यांत येत असलेल्या ठाणे-भिवंडी-कल्याण या मोनोरेलच्या प्रकल्पाबाबत. |
| ७२ | प्रभाग क्र.८५ मध्ये रहेजा गार्डन येथील म्युनिसिपल डेपो हया आरक्षणाचे प्रयोजनात बदल करुन सांस्कृतिक केंद्र असे आरक्षण करणे बाबत. |
| ७३ | ठाणे महानगरपालिका संचलित राबोडी येथील उर्दु माध्यमिक शाळा क्र.८ या शाळेसाठी इयत्ता १० वर चा वर्ग सुरु करणेस तसेच सदर शाळेकरिता शिक्षक व शिक्षकेतर पदे निर्माण करणे बाबत. |

# ठाणे महानगरपालिका, ठाणे.
# मा. सर्वसाधारण सभा

शुक्रवार दिनांक १८.६.२०१०

## विषयपत्रिका

प्रति,

सन्मा.श्री/श्रीमती-------------------------
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## अनुक्रमणिका



| अनुक्रमांक | तपशिल | पान क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | विषयपत्रिका | ०१ | ०३ |
| २. | सन्मा.सदस्यांच्या प्रश्नांची यादी | ०१ | ०६ |
| ३. | सन्मा.सदस्यांची मागील सभेत राखून ठेवण्यांत आलेली प्रश्नोत्तरे | | |
| ४. | मा.सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त<br>दिनांक १७.३.२०१०<br>दिनांक १८.३.२०१०<br>दिनांक १८.३.२०१० | <br>१<br>१<br>१ | <br>११६<br>६१<br>८० |
| ५. | प्रकरण क्रमांक/गोषवारा<br>प्रकरण क्र.४२ ते ५८ | | |

<u>ठाणे महानगरपालिका, ठाणे.</u>

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :-११/ ०६/२०१०

ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना
सभा सुचना क्र. २, दिनांक ०८/०६/२०१० बाबत पुरक घोषणा

प्रति,

सन्मा.श्री./श्रीमती-------------------------
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.१८/०६/२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात" सभा सुचना क्रमांक २, दिनांक ०८/०६/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्यासाठी बोलाविण्यांत आली आहे.

सदर सभेच्या खालील विषयांवर विचारविनिमय करण्यांत येईल अशी पुरक घोषणा याद्वारे करण्यांत येत आहे..

<u>मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने...........</u>

(सौ.छाया मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा सुचना क्र.२, दिनांक ०८/०६/२०१० बाबत पुरक विषयपत्रिका

| <u>प्रकरण क्रमांक</u> | <u>विषय</u> |
| --- | --- |
| ६१ | ठाणे महानगरपालिकेचे आस्थापनेवर उपआयुक्त या संवर्गात नव्याने २ पदे निर्माण करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे बाबत. |
| ६२ | प्रभाग क्रमांक ८८ पारशीवाडी, बोभाटे चाळ येथे १६ सीटच्या शौचालयाची पुनर्बांधणी करणे बाबत येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत. |

--२/-

६ ३ ठाणे महानगरपालिका संचलित राबोडी येथील उर्दु माध्यमिक शाळा क्र.८ या शाळेसाठी इयत्ता १० वर चा वर्ग सुरु करणेस तसेच सदर शाळेकरीता शिक्षक व शिक्षकेतर पदे निर्माण करण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे बाबत.

६ ४ गोखले रोड व बी केबीन रोड जंक्शन वरील रस्ता रुंदीकरणाने बाधीत होणा-या जी मॅन दुकानाच्या जागेबाबत पर्यायी जागा गांवदेवी मार्केटमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

( सौ. छाया मानकर )
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : ११.०६.२०१०

## ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक: १८.६.२०१०

शुक्रवार दिनांक १८.६.२०१०रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेपुढे आलेल्या आयत्यावेळेच्या विषयांची यादी.

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयासाठी मानधनावर ( प्रती केस बेसिस) उपलब्ध होणा-या बधिरीकरण तज्ञांचे पॅनेल दोन वर्षांकरिता नियुक्त करणे बाबत. |
| २ | वागळे प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक ७४ येथील रस्ता क्र.२२ साईराज बिल्डींग ते रेणुका सदन पर्यंत रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करणे. |
| ३ | स्पास्टिक मुलांच्या डे केअरसाठी जागा भाडे तत्वावर देणे बाबत. |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

सही /- सौ.छाया प्र.मानकर,
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

<u>ठाणे महानगरपालिका, ठाणे.</u>

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :-१८/ ०६/२०१०

## ठाणे महानगरपालिकेच्या तहकूब सर्वसाधारण सभेचे परिपत्रक.

***************

प्रति,

सन्मा.श्री./श्रीमती-------------------------
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा, शुक्रवार दिनांक १८.६.२०१० रोजी सभा सूचना क्रमांक २ दि. ८.०६.२०१० रोजींच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती.

सदरची सभा तहकूब झाल्याने बुधवार दिनांक २३.६.२०१० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित करण्यांत आलेली आहे. सदर सभेत सभा सूचना क्रमांक २ दिनांक ८.६.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्यांत येईल.

तरी कृपया सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे ही विनंती.

<u>मा.महापौर महोदय, यांचे मंजूरीने.</u>

( सौ.छाया प्र.मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : १८.६.२०१०